# कार्यालय निवडणूक अधिकारी

**(305, उषानगर एक्सटेन्शन, रणजीत हनुमान मेन रोड, पूनम ज्वेलर्स च्या वर, इंदौर (मध्यप्रदेश) 452009)**

इंदूर

गुरुवार 05-02-2026

## <u>टपाल मतदान सुविधे संबंधी अधिसूचना</u>

बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली याच्या सत्र 2026 – 2029 करिता प्रसिद्ध पदानुरूप उमेदवारांची अंतिम यादी प्रमाणे कार्यकारिणीच्या विभिन्न पदांकरिता रविवार दिनांक 01/03/2026 रोजी अधिवेशन स्थळी मतदान नियोजित आहे. निवडणूक संहिता खंड 1 कलम अ: आणि खंड 2 कलम 2.5.1 मध्ये निर्देशित केल्या प्रमाणे ही अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे. मी निवडणूक अधिकारी वर उल्लेखित मतदानात सहभागी होण्यास खाली नमूद दोन श्रेणीतील मतदारांकडून त्यांना टपाल माध्यमाद्वारे मतदानाची पात्रता आणि इच्छा असल्यास टपाल माध्यमाद्वारे मतदान करण्यासाठी अर्ज आमंत्रित करीत आहे. या संबंधी चा विविध सूचना आणि अटी खालील प्रमाणे आहेत.

1. निवडणूक संहितेतील खंड 2 कलम 2.5.2.1 अन्वये निवडणूक घोषणा तिथिस अर्थात **25 डिसेंबर 2025 रोजी किमान 75 वर्ष वय पूर्ण केलेले आजीवन आणि वैयक्तिक संरक्षक श्रेणीतील मताधिकार प्राप्त सभासद टपाल मतदानास पात्र आहेत**. अश्या व्यक्तींनी अर्जा सोबत वयाचा कुठलाही फोटो युक्त सरकारमान्य परिचयपत्र (उदा. आधार कार्ड, पासपोर्ट, ड्रायविंग लायसेन्स, मतदाता परिचय पत्र इत्यादी) ची प्रत प्रस्तुत करावी.
2. निवडणूक संहितेतील खंड 2 कलम 2.5.2.2 अन्वये कुठल्याही प्रकारची दिव्यांगते (विकलांगते) नी ग्रस्त असलेले आजीवन आणि वैयक्तिक संरक्षक श्रेणीतील मताधिकार प्राप्त सभासद. अश्या व्यक्तींनी अर्जा सोबत दिव्यांगते (विकलांगते) संबंधी डॉक्टर द्वारे सत्यापित कुठलाही सरकारमान्य दाखला, जो जास्तीत जास्त 6 महिने जुना असू शकतो, प्रस्तुत करावा. सहा महिन्या पेक्षा जुना दाखला ग्राह्य धरला जाणार नाही. परंतु कुठल्याही केंद्र अथवा राज्य सरकार द्वारा दिलेले दिव्यांगते (विकलांगते) संबंधातील स्थायी प्रमाण पत्रास 6 महिन्याची अट लागू असणार नाही. येथे दिव्यांगते (विकलांगते) ची परिभाषा **Persons With Disabilities** (Equal Opportunities, Protection of Rights and Full Participation) **Act, 1995** मध्ये समाविष्ट परिभाषेनुरूप आहे.
3. टपाल मतदानासाठीच्या अर्जाचा प्रारूप संलग्नक 1 मध्ये दिलेला आहे.

<u>**टपाल मतदान साठीचा अर्ज कसा करावा**</u>

1. टपाल मतदाना साठी पात्र आणि इच्छुक सभासदांनी संलग्नक 1 मध्ये नमूद प्रारूपात आपला अर्ज मला खाली दिलेल्या संपर्क माध्यमांतून माझ्या पर्यंत पाठवावा. व्हॉटसप्प आणि ईमेल माध्यमाने प्राप्त अर्ज सुद्धा ग्राह्य असतील. व्हॉटसप्प आणि ईमेल माध्यमाने अर्ज पाठवितांना प्रारूपात असलेली सर्व माहिती टाईप करून व्हॉटसप्प किंवा ईमेल केली तरी ग्राह्य असेल. या सोबत पात्रते संबंधीचे प्रमाण पत्राची प्रत आणि टपाल मतपत्र शुल्क भरल्याची पावती/स्क्रीनशॉट पण संलग्न करावा. निवडणूक अधिकारीस टपाल मतदान सुविधा अर्ज प्राप्त होण्याची अंतिम मुदत दिनांक 12-02-2026 सायं:06:00 वाजताची आहे.

निरंतर .....2

**निवडणूक अधिकारी**
बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

**टपाल मतदान शुल्क कसे भरावे**

1. टपाल मतदाना साठी पात्र आणि इच्छुक सभासदांनी टपाल मतपत्र शुल्क रुपये शंभर फक्त (रु.100/-) नेफ्ट(NEFT) किंवा आय.एम.पी.एस. (IMPS) किंवा कुठल्याही वॉलेट/यु.पी.आई. इत्यादी माध्यमांतून खाते अंतरण (Account Transfer) द्वारा खाली नमूद बँक खात्यात भरले जाऊ शकेल. अंतरण झाल्याची पावती/सूचना अंतरण संदर्भ संख्येसह (transaction reference number) सह किंवा भरणा केल्याच्या स्क्रीनशॉट (screenshot) सह आपल्या अर्जा सोबत संलग्न करावी. **कृपया रोख (cash) माध्यमांतून शुल्क भरू नये. रोख (cash) माध्यमांतून शुल्क भरल्यास मान्य होणार नाही.** टपाल मतपत्र पाठवायच्या वेळेस ह्या शुल्क पावती ची शहानिशा बँकेच्या रेकॉर्ड वरून केली जाईल. आणि मंडळास शुल्क प्राप्त नसेल झाले तर अर्जाची दखल घेतली जाणार नाही .

**बँक खात्याची संबंधित माहिती**

| | | |
|---|---|---|
| खातेदाराचे नांव | : | बृहन्महाराष्ट्र मंडळ |
| खात्याचे स्वरूप | : | सेव्हिंग खाते |
| खाते क्रमांक | : | 20055234334 |
| बँक आणि शाखा | : | बँक ऑफ महाराष्ट्र , करोलबाग शाखा, नवी दिल्ली |
| आय.एफ.एस. कोड (IFSC) | : | MAHB0000140 |

**टपाल मतपत्र मतदारांस पाठविणे आणी त्यांची पुनर्प्राप्ती**

1. अर्ज प्राप्त झाल्यावर माझ्या द्वारे कार्यकारिणी आणि विभागीय पदांसाठी नियत असलेले मतपत्र आपल्या सही व शिक्क्यानिशी प्रत्येक टपाल माध्यम मतदात्यास अर्जात पुरविलेल्या टपाल पत्त्यावर भारतीय टपाल खात्याच्या “नोंदणीकृत टपाल (Registered Post)” किंवा “स्पीड पोस्ट (Speed Post)” ह्या माध्यमांतूनच पाठविला जाईल. ह्या मतपत्रा सोबत टपाल माध्यमांतून मतदान कसे करावयाचे ह्या संबंधीचे निर्देशपत्र आणि तसंच उलट टपाली मत पाठविण्या साठी छोटा लिफाफा आणि पाठविण्याचा पत्ता नमूद असलेला मोठा लिफाफा पण पाठविण्यात येईल.
2. टपाल मतपत्र प्राप्त झाल्यावर संबंधित मतदाता मतदान निर्देश पत्र वाचतील आणि त्यातील निर्देशांप्रमाणे आपल्या पसंतीच्या उमेदवारांस अधिकृत मतपत्रात आपले मत अंकित करतील. तदनंतर हे मतपत्र सोबत असलेल्या छोट्या लिफाफ्यात टाकून निर्देशाप्रमाणे सीलबंद करतील आणि नंतर हा छोटा लिफाफा मोठ्या लिफाफ्यात टाकून मोठा लिफाफा बंद करून भारतीय टपाल खात्याच्या “नोंदणीकृत टपाल (Registered Post)” किंवा “स्पीड पोस्ट (Speed Post)” ह्या माध्यमांतूनच निर्देशित पत्त्यावर उलट टपाली अश्या अवधीत पाठवतील कि ते मतपत्र ठरवलेल्या मुदतीत निवडणूक अधिकारी यांना प्राप्त होईल. सामान्य टपालाने पाठविल्यास तर वेळेत प्राप्तीची शाश्वती नसते तरी जर कोणी स्वतःच्या जबाबदारीवर सामान्य टपालाने आपले मत पाठविले आणि निवडणूक अधिकारीस वेळेत मिळाले नाही तर त्या संबंधात पुढे कुठलीही तक्रार घेतली जाणार नाही.
3. मतदानाची गोपनीयता अक्षुण्ण ठेवण्याकरिता ही काळजी घेतली जाईल कि टपाल मतपत्रावर किंवा आतल्या छोट्या लिफाफ्यावर असा कुठला ही आकडा, शब्द किंवा चिन्ह उमटविले जाणार नाही जेणे करून मतदाता कोण आहे हा अंदाज बांधला जाऊ शकेल .

**निवडणूक अधिकारी**
बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

निरंतर ...3

4. टपाल मतपत्रावर आणि संलग्न छोट्या लिफाफ्यावर संबंधित टपाल माध्यम मतदात्यास पाठविण्या आधी निवडणूक अधिकारी योग्य स्थानी आपले हस्ताक्षर आणि शिक्कामोर्तब करतील.
5. निर्धारित अवधीत उलट टपाली प्राप्त मतपत्र असलेले लिफाफे सांभाळून ठेवले जातील जे निवडणूक मतमोजणीच्या वेळीस उघडले जातील आणि निर्धारित प्रक्रिये अंतर्गत मतमोजणीस घेतले जातील.

**टपाल मतपत्र वेळापत्रक**

| क्र. | टपाल मतदान संबंधी विविध टप्पे | तिथी पत्रक | |
|---|---|---|---|
| 1 | टपाल मतदाना साठीचे अर्ज घेतले जातील | 05/02/2026 (गुरुवार)<br>सकाळी 11:00 पासून | 12/02/2026 (गुरुवार)<br>सायं 06:00 वा. पर्यंत |
| 2 | निवडणूक अधिकारी द्वारे टपाल मतपत्रे अर्जदारांना पाठविले जातील | 09/02/2026 (सोमवार)<br>सकाळी 11:00 पासून | 14/02/2026 (शनिवार)<br>सायं 06:00 वा. पर्यंत |
| 3 | टपाल मध्यामांतून मतपत्र प्राप्ती | 12/02/2026 (गुरुवार)<br>सायं 06:00 वा. पर्यंत | 26/02/2026 (गुरुवार)<br>सायं 06:00 वा. पर्यंत |
| 4 | टपाल मतमोजणी | 01/03/2026 (रविवार)<br>नियत नियमित मतदान अवधी समाप्त झाल्यावर | मतमोजणी समाप्ती नंतर घोषणा |

**संपर्क माध्यम**

समस्त टपाल मतदान साठी इच्छुक सभासदांना निवेदन आहे कि त्यांनी आवश्यक संलग्नकांसह आपापले अर्ज खाली नमूद कुठल्याही विकल्पांवये मला पाठवू शकतात तसंच काही शंका असल्यास किंवा काही खुलासा हवा असल्यास देखील याच विकल्पांवये संपर्क केला जाऊ शकेल. प्रत्येक संपर्काचे रेकॉर्ड ठेविले जाईल म्हणून कृपया मोबाईल वर प्रश्न विचारू नये. फक्त लेखी विचारलेल्या प्रश्नांनाच उत्तर दिले जाईल.

1. ईमेल elect2026@bmmindia.org.in वर निवेदन पाठवून
2. व्हॉटसप संपर्क क्रमांक 9424688400 वर निवेदन पाठवून
3. किंवा टपाल माध्यमांतून खालील पत्त्यावर पत्र लिहून

**श्रीमती शरयू भालचंद्र वाघमारे**
**निवडणूक अधिकारी (बृहन्महाराष्ट्र मंडळ)**
**305, उषानगर एक्सटेन्शन, रणजीत हनुमान मेन रोड,**
**पूनम ज्वेलर्स च्या वर,**
**इंदौर (मध्यप्रदेश) 452009**

**अन्य सूचना**

1. एकाच घरांतून किंवा शहरांतून अर्ज एका पेक्षा जास्त अर्जदारांचे अर्ज जरी एकाच मोबाईल / ईमेल / टपालाने आले तरी निवडणूक अधिकारी द्वारे टपाल मतपत्रे वेगवेगळीच पाठविली जातील आणि मत अंकित असलेले मतपत्र निर्देशपत्रात नमूद केल्या प्रमाणे वेगवेगळेच प्राप्त केले जातील. मतपत्र वेगवेगळे प्राप्त झाले नाही तर ते गणनेस ग्राह्य धरले जाणार नाहीत.

निरंतर ...4

**निवडणूक अधिकारी**
बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

2. निर्देशानुसार आपले मत अधिकृत मतपत्रात अंकित केल्यानंतर निवडणूक अधिकारीस भारतीय टपाल खात्याच्या "नोंदणीकृत टपाल (Registered Post)" किंवा "स्पीड पोस्ट (Speed Post)" ह्या माध्यमांतूनच पूर्वांकित पत्त्यावर पाठवावे. सामान्य टपालाने पाठविल्यास तर वेळेत प्राप्तीची शाश्वती नसते तरी जर कोणी स्वतःच्या जबाबदारीवर सामान्य टपालाने आपले मत पाठविले आणि निवडणूक अधिकारीस वेळेत मिळाले नाही तर त्या संबंधात पुढे कुठलीही तक्रार घेतली जाणार नाही.
3. कोणाही मतदाराचे टपाल मत व्हॉटसप किंवा ईमेल वर स्वीकारले जाणार नाही.
4. सभासदांनी नोंद घ्यावी कि टपाल मतदानाची सुविधा घेतल्यास सभासदास टपाल माध्यमांतूनच मतदान करावे लागेल. अश्या सभासदांनी आपले टपाल मत पाठविले किंवा नाही पाठविले, कुठल्याही परिस्थितीत त्यांना मदतान स्थळावर उपस्थित राहून मतदान करण्याची पात्रता असणार नाही.
5. आपले मत अंकित असलेले टपाल निवडणूक अधिकारीस अधिकतम 26/02/2026 (गुरुवार) सायं 06:00 वा. पर्यंत मिळून जायला हवे या बेतानेच पाठवावे. दिनांक 26/02/2026 (गुरुवार) सायं 06:00 वा. पर्यंत प्राप्त न झालेली मते मतमोजणी साठी स्वीकारली जाणार नाही.
6. सभासदांनी नोंद घ्यावी कि फक्त स्थायी (कायम स्वरूपी) दिव्यांगता (विकलांगता) असल्यासच संबंधित श्रेणीत टपाल मतदानाची सुविधा घेता येईल.
7. कुठल्याही अपरिहार्य कारणास्तव मतदानाच्या तिथी व वेळापत्रकात आणि मतदान स्थळात फेरबदल केला जाऊ शकेल ज्याची सूचना यथासंभव लवकरात लवकर प्रसिद्ध करण्यात येईल व नोंदणीकृत अधिवेशन प्रतिनिधींना आणि उमेदवारांना संपर्क क्रमांक उपलब्ध असल्यास मोबाईल वर कळविले जाईल. टपाल माध्यमातून प्राप्त मतांची गणना मतदान स्थळावरच्या मतमोजणी केंद्रावरच नियत वेळापत्रका प्रमाणे होईल.

निवडणूक संदर्भात पुढील समस्त सूचना, प्रक्रियेशी निगडीत तपशीलवार माहिति इत्यादी वेगळ्या पत्रकात प्रसिद्ध केली जाईल जी बृहन्महाराष्ट्र मंडळ इंटरनेट संकेत स्थळ व कालमर्यादा उपलब्ध असल्यास मुखपत्रात उपलब्ध केली जाईल. तरी इच्छुकांनी बृहन्महाराष्ट्र मंडळ इंटरनेट संकेत स्थळ नवीन माहिती साठी तपासात राहावे ही विनंती.

आज दिनांक 05-02-2026, गुरुवार रोजी इंदूर येथे माझ्या सही व शिक्क्यासह ही अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली

Sharyu Waghmare

श्रीमती शरयू भालचंद्र वाघमारे

निवडणूक अधिकारी

निवडणूक अधिकारी
बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली

सलग्न : वरील प्रमाणे

प्रतिलिपी : 1. प्रधान कार्यवाह , (कार्यकारीणी आणि सभासदांच्या सूचने करिता )
2. सूचना प्रौद्योगिकी प्रभारी, (सभासदांना इंटरनेट संकेतस्थळ माध्यामांतून सूचनार्थ)